ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ११ मार्च, १९५३ | अंक १०

## विविध माहिती

**लग्नापेक्षा नौकरीच बरी**—डब्लिनमधील एका बेकार ब्रह्मचाऱ्यानें आपल्या जवळचे शेवटचे पैसे खर्च करून वृत्तपत्रांत जाहिरात दिली कीं, आपण जास्तींत जास्त पैसे देणाऱ्या स्त्रीशीं लग्न करण्यास तयार आहोंत. त्याच्या जाहिरातीला विधवांचीं व अविवाहित स्त्रियांचीं उत्तरें आलीं. पांच उत्तरांत त्याला रोख रक्कम देऊं केली होती. सहाव्या उत्तरांत त्याला नौकरी देऊं करण्यांत आली होती. बेकार ब्रह्मचाऱ्यानें नौकरीच पत्करली.

**नागपूरचें नभोवाणी केंद्र**—अखिल भारतीय नभोवाणीच्या नागपूर येथील नव्या केंद्राचें उद्‌घाटन डॉ. केसकर यांच्या हस्तें ता. १२ मार्च रोजीं होणार आहे. हें नभोवाणी केंद्र १० किलोवॅट शक्तीचें आहे. त्यावरील कार्यक्रम ५९० किलोसायकल्स अथवा ५०८·५ मीटर्स ह्या लहरीवर ऐकूं येतील.

**रत्नागिरीची वाळू जपानला जाणार**—रत्नागिरी व जयगड ह्यांच्या दरम्यान सांपडणारी वाळू जपानला पाठविण्याची योजना मुंबईच्या तीन कंपन्यांनीं आंखली आहे, असें समजतें. ह्या कंपन्यांच्या कचेऱ्या जपानला आहेत. ह्या वाळूंत टिटॅनिअम हें द्रव्य आहे. वाळू भरून घेण्यासाठीं जपानी व अमेरिकन बोटी जयगड बंदराजवळ थांबणार आहेत. ही वाळू निर्यात करण्यास भारतीय सरकारची बंदी नाहीं.

**उल्काच्या दगडांना मागणी**—न्यूयॉर्क येथील मिटिऑर सोसायटी ऑफ जिनीव्हा ह्या संस्थेनें उल्कांचे दगड आणून देणारांना बक्षिसें जाहीर केलीं आहेत. १ पौंड वजनाच्या दगडाला ४ रुपये देण्यांत येतात. न्यूयॉर्क संस्थानांतच तो दगड सांपडला असेल तर वरील रकमेशिवाय २० रुपये बोनस म्हणून देण्यांत येतात. आतांपर्यंत फक्त दहा–बारा जणांनाच असे दगड सांपडले आहेत.

**कॉमेट विमानांची खरेदी**—एअर–इंडिआ–इंटरनॅशनल कंपनीचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं दोन कॉमेट जातीचीं विमानें विकत घेण्याची शिफारस भारत सरकारला केली आहे. कॉमेट–३ ह्या जातीचीं हीं विमानें असून अद्याप तीं तयार व्हावयाचीं आहेत. अशा प्रकारच्या विमानांत ६० ते ९० उतारू वाहून नेण्याची सोय असते.

**चीन–पाकिस्तान दळणवळण**—चीनची राजधानी पेकिंग आणि कराची ह्यांच्या दरम्यान रेडिओ–टेलिफोनचें दळणवळण ता. १ मार्च पासून सुरू करण्यांत आल्याचें समजतें. सर्व टेलिग्राफाहि ह्याच मार्गानें धाडण्यांत येणार आहेत.

**आसाममधील पाटबंधारे**—आसाम राज्य सरकारनें पाटबंधाऱ्यांचीं २२ नवीन कामें सुरू करण्याचें ठरविलें आहे. तीं सर्व कामें पुरीं झाल्यावर ५५,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल आणि ७,००० टन अधिक तांदूळ पिकेल. पाटबंधाऱ्यांना एकूण खर्च सुमारें अर्धाच लाख रुपये येईल.

**कलकत्त्याला पेनिसिलिनचा कारखाना**—प. बंगालचें सरकार कलकत्ता येथें पेनिसिलिनचा एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. कारखान्याच्या भांडवलापैकीं ३,५०,००० रुपये सरकार देणार असून उरलेलें खाजगी कंपन्या आणि व्यक्ती ह्यांच्याकडून जमविण्यांत येणार आहे, असें समजतें.

**इजिप्त–पूर्व जर्मनी करार**—इजिप्त व पूर्व जर्मनी ह्या राष्ट्रांनीं आपसांत एक व्यापारी करार केला आहे. इजिप्त पूर्व-जर्मनीला कॉटन फॉस्फेट्स व कांदे पुरविणार असून पू. जर्मनीकडून यंत्रें, विजेचीं उपकरणीं व खतें घेणार आहे. दोन्ही देशांमधील आयात अगर निर्यात ह्यांच्या किंमतीची तफावत ५,००,००० इजिप्शन पौंडांपेक्षा अधिक कधींहि असतां कामा नये असेंहि ठरलें आहे.

**सहकारी परिषद्**—महाराष्ट्र विभागाची पहिली सहकारी परिषद् कोल्हापूर येथें ता. २२ मे रोजीं भरविण्यांत येणार आहे. भारताचे अर्थमंत्री श्री. सी. डी देशमुख ह्यांच्या हस्तें परिषदेचें उद्‌घाटन करण्यांत येणार आहे.

**वैद्यकीय शिक्षण परिषद्**—येत्या ऑगस्ट महिन्यांत लंडन येथें वैद्यकीय शिक्षणासंबंधीं विचार करण्यासाठीं डॉक्टर मंडळींची एक जागतिक परिषद् भरणार आहे. ह्या परिषदेला ४३ देशांचे मिळून सुमारें ५०० डॉक्टर्स हजर रहातील, असें समजतें. भारतातर्फेंहि प्रतिनिधी जाणार आहेत.

**गेल्या शंभर वर्षांतील भारतीय व्यापार**—बंगाल चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें गेल्या शंभर वर्षांतील भारतीय व्यापार ह्या नांवाचा एक २०० पानांचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. ह्याच विषयासंबंधीं कलकत्त्याच्या स्टेट्‌समन पत्रानेंहि कांहीं जादा पानें मजकूर प्रसिद्ध केला आहे. लंडन टाइम्सनें आपल्या २६ फेब्रुआरीच्या अंकांत दोहोंचाहि उल्लेख केला आहे.

**रत्नागिरी जिल्ह्यांतील समाजविकास योजना**—रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वर तालुक्यांत सुरू करण्यांत येणाऱ्या समाजविकास योजनेला मुंबई राज्य-सरकारनें अग्रहक्क दिला आहे असें समजतें. ह्या योजनेसाठीं सरकार सुमारें २० लाख रुपये मंजूर करील.

### पंचवार्षिक कार्यक्रमावर टीका

पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचे एकाकाळचे आर्थिक सल्लागार डॉ. ग्यानचंद ह्यांनी दिल्ली येथील हिंदू कॉलेजमध्यें भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं नुकतेंच एक व्याख्यान दिलें. ते म्हणाले कीं, ज्या सामाजिक बदलांचा पं. नेहरू एकसारखा उच्चार करीत असतात ते बदल कार्यक्रमानें घडून येणार नाहींत. पंचवार्षिक कार्यक्रमानें उत्पन्नाचीं जीं उद्दिष्टें ठरवून दिलीं आहेत तीं पूर्ण झालीं तरीसुद्धां माझ्या वरील विधानाला बाध येणार नाहीं. पं. नेहरूंच्या अलीकडील कांहीं भाषणांतील भाग वाचून दाखवून डॉ. ग्यानचंद म्हणाले कीं कार्यक्रमाचे शिल्पकार असें मानीत आहेत, कीं त्यामुळें देश समाजवादाची वाट चालू लागेल. आधुनिक लोकशाहीला जर कांहीं अर्थ प्राप्त व्हावयाचा असेल तर राजकीय समतेबरोबर आर्थिक न्यायाचीहि उभारणी झाली पाहिजे, हें पंडितजींचें म्हणणें बरोबर आहे. किमान उत्पन्न आणि कमाल उत्पन्न ह्याच्यामधील तफावत कमी करणें असा एक गर्भित हेतु कार्यक्रमांत आहे. सध्यां ही तफावत १ रु. ते १,००,००० रुपयांपर्यंत आहे. ह्या व इतर प्रश्नांसंबंधीं जितका खोलवर विचार व्हावयास पाहिजे होता तितका तो कार्यक्रमांत करण्यांत आलेला नाहीं. तथापि ह्या प्रश्नांना कार्यक्रम जीं उत्तरें देईल त्यावर देशाचें भवितव्य ठरणार आहे. जो कोणी भविष्यकालासाठीं नियोजन करीत असेल त्यानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं कार्यक्रमांतील उद्देश लवकर साध्य करून घेतले पाहिजेत. जगांतील परिस्थिति आणि देशांतील लोकांची अवस्था इतकी भयसूचक आहे कीं एक दिवसाचा विलंबहि योग्य ठरणार नाहीं. डॉ. ग्यानचंद ह्यांचे आक्षेप कार्यक्रमाच्या उद्दिष्टाविषयीं नसून ती साध्य करण्याच्या काळासंबंधीं आहेत असें दिसतें. परंतु पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही देशांत सुरू करीत असतांना कार्यक्रमाला अधिक वेग कसा यावा ह्याचा खुलासा त्यांनीं केलेला नाहीं.

### ब्रिटनमधील बेकारी आणि चलन-संकोच

ब्रिटनच्या सरकारनें चलन-संकोचाचें धोरण स्वीकारल्यापासून तेथें आर्थिक अडचणी वाढत चालल्या आहेत असें दिसतें. ह्या आर्थिक अडचणींची एक बाजू म्हणजे बेकारांच्या संख्येंत झालेली वाढ. सध्या ब्रिटनमध्यें ५,००,००० कामगार बेकार आहेत. सुमारें एक वर्षापूर्वी त्यांची संख्या ३,००,००० होती. १९५० च्या जूनमध्यें २,८२,००० कामगार बेकार होते. ही संख्या विमा उतरलेल्या कामगारांच्या १·५ टक्के एवढी आहे. हल्लीं जे ५,००,००० कामगार बेकार आहेत त्यांचा विचार ब्रिटनमधील काम करणाऱ्या लोकांची एकूण संख्या लक्षांत ठेवूनच केला पाहिजे. कामधंदा करणाऱ्या लोकांची ब्रिटनमधील संख्या २·४ कोटी आहे. बेकारांच्या पैकीं किती लोक एक नोकरी सोडून दुसरी शोधीत असतात त्याचाही विचार झाला पाहिजे. दोन महायुद्धांच्या दरम्यान ब्रिटनमध्यें बेकारी फार मोठ्या प्रमाणावर उसळली होती. विमा उतरलेल्या कामगारांपैकीं १० टके कामगार ह्या काळांत बेकार होते. त्या मानानें सध्यांची बेकारी खूपच कमी आहे. ज्यां उद्योगधंद्यांतून बेकारी माजली आहे, त्यांना तीन गोष्टींचा उपद्रव पोंचला आहे. मालाच्या उतरत्या किंमती, परदेशांची वाढती स्पर्धा आणि निरनिराळ्या देशांनीं आयातीवरील घातलेलीं बंधनें, ह्या त्या गोष्टी होत. १९३० सालापासून बेकारी कमी करण्याचें तंत्र बरेंच माहीत झालेलें आहे. ब्रिटनमधील सर्वच राजकीय पक्षांनीं लोकांना वाढत्या प्रमाणांत आणि स्थिर काम पुरविण्याच्या कार्यक्रमाचा अंगीकार केलेला असल्यामुळें त्यांना ह्या तंत्राचा उपयोग करावाच लागेल. ह्याच दृष्टीनें संरक्षणाच्या योजनेंत फेरफार करून धातुविषयक उद्योगधंद्यांना अधिक निर्यात करण्यास उत्तेजन देण्यांत आलें. तथापि, हा उपाय अपुरा आहे असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. पुढील अंदाज-पत्रकांत कर कमी करून कारखान्यांची स्पर्धेची शक्ति वाढवावी लागेल. त्याशिवाय कारखान्यांचा विस्तार व नवी यंत्रसामुग्री ह्यांनाहि पैसा लागेल.

### ओरिसा-राज्यांत ट्रॅक्टर्सचा कारखाना ?

भारताच्या नियोजन-मंडळानें असा अंदाज केला आहे कीं, भारताला दरवर्षी १०,००० ट्रॅक्टर्सची गरज लागेल. तण उगवलेल्या जमिनी आणि पडीक जमिनी लागवडीखालीं आणण्याचें काम अलीकडे वाढत्या प्रमाणावर होऊं लागलें असल्यानें पुढील पांच वर्षांअखेर दरसाल सुमारें १५,००० ट्रॅक्टर्स लागण्याचा संभव आहे. तथापि भारतांत ट्रॅक्टर्स तयार करण्याचा कारखाना मात्र नाहीं, ही मोठी उणीव आहे. कांहीं कारखाने असा कारखाना काढण्याचे प्रयत्न झपाट्यानें करणार असल्याचें समजतें. ओरिसा सरकारही कांहीं खाजगी भांडवलदारांच्या मदतीनें शेतीला लागणाऱ्या यांत्रिक नांगरांचा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. संकल्पित कारखान्याच्या उभारणीसाठीं २ कोटी रुपयांचें भांडवल लागेल आणि ट्रॅक्टर्सना लागणाऱ्या सुट्या भागांचें उत्पादन करण्यासाठीं १५ लाख रुपयांचें खेळतें भांडवल लागेल. ३० अश्वशक्ति असणारे व पेट्रोल अगर रॉकेलवर चालणारे ट्रॅक्टर्स तयार करण्याचें घाटत आहे. परदेशाहून अशा प्रकारचे ट्रॅक्टर्स आयात करावयाचें झाले तर प्रत्येक ट्रॅक्टरला ७,५०० ते ९,००० रुपये मोजावे लागतात. भारतांतच त्यांचें उत्पादन करू लागल्यास निम्म्या किंमतींत ते तयार होऊं शकतील असें समजतें. अर्थातच, देशी ट्रॅक्टर्स तयार करण्याची निकड फार आहे. निरनिराळ्या प्रकारच्या जमिनी आणि वेगवेगळ्या आकाराच्या जमिनी लक्षांत घेऊन त्यांच्या नांगरणीस उपयुक्त ठरतील असेच नांगर तयार करावे लागतील. प्रत्येक प्रकारचे नांगर किती लागतील हें आजच सांगणें कठीण आहे. नियोजन मंडळानें ह्या सर्व प्रश्नांचा दूरवर विचार केलेला दिसतो. कारण, ट्रॅक्टर्सचें उत्पादन आणि मोटारींचे उत्पादन कांहीं बाबतींत तरी एकाच तऱ्हेचें असल्यामुळें ह्या दोन्हींच्या उत्पादनाचा तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या मेळ घालण्यांत आला पाहिजे, असें मत नियोजन मंडळानें व्यक्त केलें आहे.

### औद्योगिक उत्पादनांत वाढ

१९२९ चे मानानें १९५१ मधील जागतिक औद्योगिक उत्पादन दुप्पट झालें आणि १९३७ चे मानानें तें ७५% ज्यास्त होतें.

१९४८ ते १९५१ ह्या मुदतींत युरोपांत उत्पादन ४५% वाढलें. अमेरिकेंतील १९४८ मधील उत्पादनाच्या उच्चांकांत १९५१ मध्यें १५% ची वाढ झाली.

१९२९ चे मानानें १९५१ मधील रशिआंतील उत्पादन दहापट झालें. युनायटेड स्टेट्स १००%, अमेरिका व रशिआ वगळून बाकीचें जग ५८%, सबंध जग १०८%, असें उत्पादन वाढीचें प्रमाण होतें.

# अर्थ

बुधवार, ता. ११ मार्च, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेचा शेतीस कर्जपुरवठा

रिझर्व्ह बँकेनें १७ व्या कलमाखालीं राज्य सहकारी बँकांना मोसमी शेतकामें व पीकविक्री ह्यांच्यासाठी १०.४५ कोटी रुपयांचीं कर्जें १९५२ मध्यें दिलीं. त्यांवरील व्याजाचा दर १½% (म्हणजे बँकरेटपेक्षा २% कमी) होता. राज्यांतील सहकारी बँकांनीं किती व्याजाचा दर आकारावा, ह्यावर रिझर्व्ह बँकेचें नियंत्रण नाहीं.

### कर्जांची राज्यवार वांटणी

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| | |
|---|---|
| मुंबई | ४१४.८५ |
| मद्रास | ४४४.९३ |
| मध्यप्रदेश | ४६.९० |
| उत्तरप्रदेश | ४९.२५ |
| ओरिसा | २७.५० |
| प. बंगाल | ६०.०० |
| अजमीर–मारवाड | १.७० |
| एकूण | १०४५.१३ |

वेगवेगळ्या राज्यांतील प्राथमिक सहकारी सोसायट्या किती दरानें कर्ज आकारतात, ह्याचा उपलब्ध तपशील येथें दिला आहे.

### वेगवेगळ्या राज्यांतील प्राथमिक सहकारी सोसायट्यांचे व्याजाचे दर

| राज्याचें नांव | व्याजाचा दर % (१९५१–५२) |
|---|---|
| मुंबई (१९५०–५१) | ४–११/१६ ते ९–३/८ |
| मद्रास | ४½ ते ६¼ |
| उत्तर प्रदेश (१९५०–५१) | १२ ते १५ |
| पं. बंगाल | १२½ |
| मध्यप्रदेश | ३ ते १२ |
| ओरिसा | ८½ ते १०½ |
| बिहार (१९५०–५१) | ८ ते ९–३/८ |
| हैद्राबाद | ९–३/८ ते २० |
| राजस्थान | ७½ ते २५ |
| दिल्ली | ९–३/८ |
| म्हैसूर | ५½ ते ९ |
| अजमीर–मारवाड | ९ ते १० |

व्याजाच्या दरांतील तफावत उद्बोधक आहे. राजस्थानमधील किमान दर मद्रासमधील कमाल दरापेक्षाहि ज्यास्त आहे. सहकारी सोसायट्यांचा व्याजाचा दर कांहीं राज्यांत २०%, २५%, इतका आढळतो, ह्यावरून परिस्थितीची कल्पना येईल व उपाययोजनांची अडचणहि स्पष्ट होईल.

## शेतीचा भांडवल पुरवठा : रिझर्व्ह बँकेचे प्रयत्न

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, श्री. बी. वेंकटापय्या, ह्यांचें मद्रास येथें इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्सतर्फे "भारताच्या शेतीस भांडवल पुरवठ्याच्या योजनेंत रिझर्व्ह बँकेचें स्थान" ह्या विषयावर नुकतेंच भाषण झालें. अल्प मुदतीच्या शेतीच्या कर्जास दरसाल १०० कोटि रुपयांचें उद्दिष्ट पंचवार्षिक योजनेंत आहे. त्यांत सरकारी व सहकारी, दोन्हींच्या कर्जपुरवठ्याचा समावेश होईल. सध्या ४० ते ५० कोटी रुपयांचा कर्जपुरवठा दरसाल होतो, असा अंदाज आहे. मध्यम मुदतीच्या कर्जपुरवठ्यांत वाढ करून तें दुप्पट (२५ कोटी रु.) करावें, अशीहि योजना आहे. दीर्घ मुदतीच्या कर्ज पुरवठ्याची आजची वार्षिक रकम १ कोटि रुपये आहे, ती ५ कोटी रुपये करण्यांत येईल.

येत्या तीन वर्षांत सहकारी कर्जपुरवठ्याच्या व्यवस्थेंत किती सुधारणा केली पाहिजे हें श्री. वेंकटापय्या ह्यांनीं स्पष्ट केलें. मद्रास किंवा मुंबई ह्यासारख्या सहकारी दृष्टीनें पुढारलेल्या राज्यांत ह्या दृष्टीनें पाऊल पुढें पडण्यास अनुकूल परिस्थिति आहे. रिझर्व्ह बँकेच्या सवलतींचा अधिकाधिक फायदा तेथें घेतला जात आहे. अल्प मुदतीच्या शेत-कर्जांची मुदत १२ महिन्यांची १५ महिने करण्यांत आली आहे. पार्लमेंटापुढील नव्या बिलानें रिझर्व्ह बँकेकडून कर्जास पात्र होणाऱ्या शेत–कर्जांची व्याख्या आतां सुधारण्यांत येत आहे, त्यामुळें प्रत्यक्ष उत्पादनाच्या नंतरच्या क्रियांसाठीहि रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळण्याची सोय होईल. जीं राज्यें सहकारी दृष्ट्या मागासलेलीं आहेत, अशा ठिकाणीं रिझर्व्ह बँकेनें आपले अधिकारी पाठवून तेथील माहिती मिळविली आहे. ह्या अधिकाऱ्यांच्या अहवालांचे आधारावर, प्रत्येक राज्य सरकारच्या प्रतिनिधींशीं चर्चा करून पुढील प्रगतीचा आराखडा त्यांच्या सहकार्यानें तयार करण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँकेनें पुणें येथें वेगवेगळ्या राज्यांच्या सहकारी खात्यांच्या अधिकाऱ्यांसाठी ट्रेनिंगची व्यवस्था केली आहे. त्याच पद्धतीची व्यवस्था मद्रास येथेंहि लवकरच सुरू होईल. पंचवार्षिक योजनेंत अशा कामासाठी १० लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. रिझर्व्ह बँकेस सल्ला देण्यासाठीं एक स्टँडिंग अॅडव्हायसरी कमिटी नेमली आहे, तिच्या सल्ल्याचा फायदा बँकेच्या अॅग्रिकल्चर क्रेडिट खात्यास वारंवार मिळत असतो.

## सौराष्ट्र बँकेचीं डिबेंचर्स

सौराष्ट्र सें. को. लँड मॉर्गेज बँकेनें १ कोटि रुपयांचीं डिबेंचर्स विक्रीस काढण्यास सौराष्ट्र सरकारनें मंजुरी दिली आहे. डिबेंचर्सवर ४% व्याज दिलें जाईल आणि परतफेड सात वर्षांत होईल. ह्या बँकेची स्थापना १९५१ मध्यें झाली असून तिच्या सौराष्ट्रभर ६० शाखा आहेत.

## हिंदी व विदेशी नोकरांचें प्रमाण

कारखानदारी, व्यापार, बँकिंग, विमा, शिपिंग, मळे, मॅनेजिंग एजन्सी फर्म्स, इत्यादि व्यवसाय करणाऱ्या सर्व फर्म्सना व कंपन्यांना भारत सरकारनें जुलै, १९५२ मध्यें विनंति करून, त्यांचेकडून त्यांच्या नोकरींत असलेल्या हिंदी व परदेशी नोकरां-संबंधीं माहिती मागविली होती. १ जानेवारी, १९४७ रोजीं व त्यानंतर दरसालच्या पहिल्या दिवशीं त्यांचेकडे नोकरीस असणाऱ्यांचा तपशील त्यांनीं सरकारला सादर करावा, अशी अपेक्षा होती. १०६० फर्म्सनीं व कंपन्यांनीं मागितलेली माहिती पुरविली. तथापि, सुमारें ३०० विदेशी नियंत्रणाखालील फर्म्सनीं अद्याप माहिती पुरविलेली नाहीं. मुख्यतः परदेशी नियंत्रणाखालील १०६० फर्म्समधलि वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांपैकी (महिना १,००० रुपयांवरील) ७५% नोकऱ्या १९५२ मध्यें विदेशी-यांनाच मिळालेल्या होत्या. ५०० ते ९९९ रुपये पगाराच्या नोकरांपैकी ८५% नोकर हिंदी होते व ३०० ते ४९९ रुपये पगाराच्या नोकरांपैकी ९९% नोकर हिंदी होते. हिंदी नोकरांचें प्रमाण हळूहळू वाढत आहे:—

हिंदी नोकरांचें एकूण नोकरांशीं प्रमाण

| पगाराच्या श्रेणी | १९४७ | १९५२ |
|---|---|---|
| ३०० ते ४९९ रु. | ९६% | ९९% |
| ५०० ते ९९९ रु. | ५८% | ८५% |
| १००० रु. वर | ७·५% | २४·३% |
| | ४५१ हिंदी | २,१३७ हिंदी |
| | ५,५०७ विदेशी | ६,६६१ विदेशी |

१००० रु. वरील पगारश्रेणींत, परदेशी नियंत्रणाखालील फर्म्समध्यें, विदेशी नोकरांचें हिंदी नोकरांशीं पडणारें प्रमाण धंदेवार खालीं दिलें आहे:—

| धंदा | १९४७ | १९५२ |
|---|---|---|
| बँकिंग | ९८ | ८६ |
| विमा | ८७ | ७२ |
| वहातूक | ९५ | ७२ |
| मोटारी | ८२ | ५७ |
| छपाई, प्रकाशन | ८५ | ६७ |
| केमिकल्स, औषधें | ९१ | ६८ |
| मशिनरी, इंजिनिअरिंग | ९२ | ७० |
| कातडें, रबर | ८४ | ५७ |
| पब्लिक युटिलिटी कंपन्या | ८५ | ५२ |
| मॅनेजिंग एजन्सीज् | ९० | ७५ |
| व्यापार, एजंटस् | ९३ | ८० |
| कपास गिरण्या, प्रेसेस | ९८ | ७७ |
| ताग गिरण्या, प्रेसेस | ९९ | ९३ |
| मळे | ९९ | ९३ |
| कोळसा | ८० | ६३ |
| तेल | ८७ | ६० |
| साखर | ९७ | ८४ |
| इतर सर्व | ८० | ७२ |

विदेशी नोकरांपैकी ९०% ब्रिटिश नागरिक आहेत. ५% अमेरिकन व स्विस नागरिक आहेत. बाकीच्या ५% मध्यें इतर देशीयांचा, पण मुख्यतः युरोपियनांचा भरणा आहे. एकूण विदेशीय १९४७ मध्यें ७,१६२ होते ते १९५२ मध्यें ७,६५३ झाले.

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

वरील बँकेनें १९५२ मध्यें ६५,५८५ रु. नफा मिळवला. भागीदारांना ६% करमाफ डिव्हिडंड देण्यांत येणार आहे, आणि रिझर्व्ह फंडांत १४,००० रुपयांची भर पडणार आहे. १९५२ च्या दुसऱ्या सहामाहींतील मंदीमुळें बँकेच्या कर्जांत घट झाली, त्याचा परिणाम नफ्यावर झालेला आहे. बँकेची स्वतःची नवी इमारत आतां पुरी होत आली असून, बँकेची येती वार्षिक सभा ह्या नव्या इमारतींतच होणार आहे. इमारतीच्या तळघरांत अद्ययावत् पद्धतीच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय करण्यांत आली आहे. बँकेचें वसूल भांडवल ६,००,००० रु. असून रिझर्व्ह फंड १,७६,२०७ रु. आहे. कॅश व इतर बँकांत मिळून २१ लाखांवर रक्कम असून रोख्यांतील गुंतवणूक २७ लाखांची आहे आणि ३७ लाखांचीं कर्जें दिलेलीं आहेत. ७५ लक्ष रुपयांच्या ठेवींशीं ह्या आकड्यांशीं तुलना केली असतां बँकेच्या व्यवहाराच्या तरतेपणाची कल्पना येईल. बँकेकडील ठेवींत गेल्या वर्षी १२ लाखांची भर पडली आहे आणि १९५० चे मानानें १९५२ अखेर १६ लाखांनीं ठेवी ज्यास्त आहेत. ही गोष्ट सार्वत्रिक प्रतिकूल परिस्थितींतहि बँकेचें पाऊल कसें पुढें पडत आहे हें दर्शवितें. त्याबद्दल बँकेच्या चालकांचें अभिनंदन केलें पाहिजे. (चेअरमनः एम. जी. हेरेकर, मॅनेजिंग डायरेक्टरः ए. आर. नाईक. मॅनेजरः एच. एस. कुलकर्णी)

### कारखाने वाढले पण कामगार घटले

१९४४ सालीं उत्तर प्रदेशांतील औद्योगिक कारखान्यांतून रोज काम करणाऱ्या कामगारांचें सरासरी प्रमाण सर्वांत अधिक होतें. पण तेव्हांपासून कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगारांची दैनंदिन सरासरी संख्या कमी कमी होत चालल्याचें आढळून आलें आहे. पण १९४४ सालापासून कारखान्यांच्या संख्येंत मात्र वाढच झाल्याचें दिसून येतें. १९४४ सालीं उत्तर प्रदेशांत ९४१ कारखाने होते आणि त्या सर्वांत मिळून २,७८,२२८ कामगार रोजगार करीत होते. सध्या कारखान्यांची संख्या १,१९७ इतकी आहे; पण त्यांत काम करणाऱ्या रोजंदारांची संख्या मात्र २,०२,५१४ इतकीच आहे. औद्योगिक रोजंदारींत घट होण्याचीं कारणें काय असावींत असा प्रश्न उपस्थित करण्यांत आला असता पुढील कारणें सांगण्यांत येत आहेत. युद्धसाहित्याचें उत्पादन कमी झाल्यामुळें रोजगारीहि घटली. त्याचबरोबर देशाची फाळणी, कच्च्या मालाचा तुटवडा, व्यापारी मंदी, इत्यादि कारणेंहि अंशतः जबाबदार आहेत. युद्धकालापासून कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या आणि त्यांचें पुरुष कामगारांशीं असलेलें प्रमाण ह्या दोन्ही बाबतींत बरीच घट झाल्याचें आढळून येतें. १९३९ सालीं कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ४,०८१ इतकी होती; एकूण औद्योगिक कामगारांच्या संख्येपैकी अवघ्या ३ टक्के कामगार स्त्रिया होत्या. १९५२ सालीं स्त्री-कामगारांची संख्या २,४०६ इतकीच होती. एकूण कामगारांच्या फक्त १ टक्के एवढ्याच कामगार स्त्रिया आज कारखान्यांतून कामें करीत आहेत.

### मि. ट्रुमन ह्यांना लेखांसाठी मिळणारा मोबदला

लाइफ मासिकासाठीं प्रे. ट्रुमन हे आपल्या आठवणी लिहिणार आहेत. त्याचा मोबदला म्हणून त्यांना ५,००,००० डॉलर्स मिळतील. त्यांपैकीं ४,२५,००० डॉलर्स कराच्या रूपानें सरकारला द्यावे लागतील व मि. ट्रुमन ह्यांना ७५,००० डॉलर्स उरतील.

# दुष्काळाचें रडगाणें जुनेंच आहे !

## सर्व योजनांसाठी ६०० कोटींचा प्रचंड खर्च

### चीफ इंजीनिअर श्री. चाफेकर यांचें विचारप्रवर्तक भाषण

**( १ )**

मुंबई राज्याचे चीफ इंजीनिअर श्री. चाफेकर यांचें सोलापूर येथील रोटरी क्लबांत 'महाराष्ट्र व कर्नाटकांतील दुष्काळी परिस्थिति' या विषयावर भाषण झालें. या भाषणाचा सविस्तर आशय खाली प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—


दुष्काळ अगर निमदुष्काळाची कीड, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांस नेहमींच लागलेली आहे. आजचा दुष्काळ ही कांहीं नवीन बाब नाहीं. या भागांत यापूर्वींहि अनेक दुष्काळ पडले आहेत व यापुढेंहि पडणें संभवनीय आहे. पूर्वींच्या व सांप्रतच्या दुष्काळांत फरक इतकाच आहे कीं, आज आपली गाऱ्हाणीं आरडाओरडा करून आपण जगापुढें मांडूं शकतों. या प्रदेशांत इतिहासकाळांत पडलेला दुर्गादेवीचा दुष्काळ प्रसिद्धच आहे. याप्रसंगीं पुराणांतील विश्वामित्र ऋषींची एक कथा आठवते. दुष्काळाचा कहर झाला असतांना, अन्नाच्या अभावीं विश्वामित्राची आसन्नमरण परिस्थिति झाली होती. त्या वेळीं एक हरिजन, मेलेल्या कुत्र्याची तंगडी घेऊन रस्त्यानें जात होता. विश्वामित्रानें या हरिजनास थांबवून ती तंगडी आपल्या ताब्यांत घेतली व तिचें मांस खाऊन आपल्या प्राणाचा बचाव केला. हरिजनास दया येऊन त्यानें विश्वामित्रास प्यावयास पाणी दिलें. त्या वेळीं खाद्य मिळाल्यामुळें जिवंत झालेला विश्वामित्राचा सनातनी आत्मा पुन्हा जागृत झाला व त्यांनीं हरिजनांचे हातचें पाणी नाकारलें. जिवंत राहण्यासाठीं मेलेल्या कुत्र्याचें मांस खाल्लें; परंतु पाणी न मिळाल्यामुळें आपण मरणार नाहीं, म्हणून अस्पृश्याच्या हातचा पाण्याचा घोट विश्वामित्रानें नाकारला.

सारांश, दुष्काळ ही आपल्या प्रदेशामध्यें नवीन घटना नाहीं. अनादिकालापासून हें संकट या भागांत कोसळत आहे. गेल्या ५० वर्षांचा या प्रदेशाचा इतिहास पाहिला म्हणजे इतक्या अल्पकाळांत येथें १५–२० दुष्काळ पडले असें दिसून येतें. आज आपण स्वातंत्र्याच्या काळांत व आधुनिक जमान्यांत जगत आहों; त्यामुळें सांप्रतच्या दुष्काळाचा गाजावाजा विशेष होत आहे. या दुर्दैवी भागांत दर पांच वर्षांमध्यें एखादें वर्ष सुखाचें जातें व बाकीच्या चार वर्षांत कधीं दुष्काळ तर कधीं निमदुष्काळ, असें रडगाणें चालू असतें. उत्तर विजापूर भाग दुष्काळासाठीं प्रसिद्ध आहे. गेल्या तीनशें–साडेतीनशें वर्षांपासून येथील दुष्काळाचें नांव इतिहासांत गाजत आलें आहे. आदिलशाहीच्या जमान्यांतसुद्धां येथील दुष्काळी परिस्थिति थांबलेली नव्हती. अशा दुष्काळी भागांत आदिलशाहीनें विजापूर ही आपली राजधानी कां केली हें कळत नाहीं! दुष्काळी प्रदेशांत राजधानी असली म्हणजे शत्रूला स्वारी करणें जड जाईल, असाही या बाबतींत उद्देश असावा. शत्रूचा राजधानीस वेढा पडला, म्हणजे पूर्वीं महिनेचे महिने हें युद्ध चालत असे व अशी लढाई दुष्काळी प्रदेशांत चालू ठेवणें नेहमींच जड जात असेल यांत शंका नाहीं.

या प्रदेशांतील भूतकाळ मोठा सुखाचा होता, त्यां वेळीं भरपूर पाऊस पडत असे, अलीकडे पाऊसच कमी झाला आहे, असे उद्‌गार अनेक ठिकाणीं काढले जातात; परंतु ही विचारसरणी चुकीची व निराधार आहे. गेल्या १०० वर्षांतील या प्रदेशाच्या पावसाच्या आकड्यांचा अभ्यास केला, म्हणजे आजच्या काळांत देखील पूर्वींप्रमाणेंच व पूर्वींसारखाच कमीजास्त प्रमाणांत पाऊस पडत असतो, असें दिसून येतें. मानसिक परिणामामुळें पाऊस कमी पडूं लागला असें आपणांस वाटूं लागतें. आपल्या लहानपणीं पुष्कळ पाऊस पडत होता व तो आतां कमी झाला असें अनेकांना वाटतें. पण ती खरी परिस्थिति नसते. पाऊस कमी पडला या एकाच कारणामुळें दुष्काळी परिस्थिति निर्माण होते अशीहि पुष्कळांची समजूत असते. राजपुतान्याच्या किंवा सहारा वाळवंटांत, नेहमींच पाऊस कमी पडत असतो, परंतु अशा भागांतहि माणसें जगत असतात. पावसाचा अभाव म्हणून तेथें कायमची दुष्काळी परिस्थिति नसते. उत्पादन व लोकसंख्या यांच्या समतोलपणावर प्रामुख्यानें दुष्काळी परिस्थिति अवलंबून असते. पूर्वींच्या काळांत अशा दुष्काळी संकटाच्या वेळीं अनेक कारणांमुळें ही परिस्थिति आपोआपच निभावली जात असे.

विजापूरच्या मुद्देबिहाळच्या भागांत दर एकरीं लोकसंख्येचें प्रमाण शंभर आहे. मुंबई राज्यांतील इतर ठिकाणचें हेंच सरासरी प्रमाण दर एकरीं सुमारें अडीचशें आहे. या दुष्काळी भागांतील पांच वर्षांच्या उत्पादनाची सरासरी काढली, तर येथें गरजेपेक्षा जास्त उत्पादन होतें असें दिसतें. परंतु आजकाल व्यवहारांत मात्र याच्या उलट अनुभव येतो. रेल्वे, मोटारी वगैरे जलद वाहतुकीचीं साधनें निर्माण होण्यापूर्वी, दुष्काळाच्या काळांत सुद्धां अशा प्रदेशांत एकाएकीं धान्याची टंचाई निर्माण होत नसे. जेथलें धान्य तेथेंच सांठविलें जाई. अशा भागांतील जादा धान्याचा सांठा खेड्यांतील "पेवांत" केला जात असे व संकटाच्या काळीं या शिल्लक धान्याचा व इतर साहित्यांचा उपयोग केला जाई. आधुनिक काळांत हा जुना समतोलपणा (बॅलन्स) नष्ट झाला आहे. वाहतुकीच्या सोयीमुळें इतर प्रदेशांत धान्य विकलें जातें. लेव्ही पद्धतीमुळें शेतकऱ्यांजवळ धान्याचा मोठा सांठा शिल्लक रहात नाहीं. पूर्वींइतकाच पाऊस पडत असतांना व लोकसंख्येंत वाढ झालेली नसतांना, अशा भागांत संकटाची परिस्थिति निर्माण होते याचें मुख्य कारण म्हणजे जुन्या काळांतील आपोआप निर्माण होणारा समतोलपणा आजकाल नष्ट झाला आहे. विजापूर, सोलापूर आणि अहमदनगर हे प्रदेश प्रामुख्यानें दुष्काळी म्हणून समजले जातात. परंतु आजकालच्या प्रचाराच्या युगांत या प्रदेशांतील कांहीं सुपीक भागांसुद्धां, दुष्काळी अगर निमदुष्काळी ठरविण्याबाबत मोठा गाजावाजा केला जातो. विजापूर जिल्ह्याचा पूर्व व दक्षिणेकडील कांहीं भाग खरोखरच कायम दुष्काळी समजण्यासारखा नाहीं. मुंबई प्रांतामधील सांप्रतच्या दुष्काळाच्या खाईत सुमारें दीड कोट एकर जमीन सांपडलेली आहे.

SAVE to help yourself and the NATION,

WITH  THE

HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum*

महाराष्ट्र व कर्नाटकाचा हा कायम दुष्काळी प्रदेश, एका दृष्टीनें फारच दुर्दैवी आहे. अरबी समुद्रावरून पावसाचे वारे पश्चिम किनाऱ्यावरील सह्याद्रि पर्वतावर प्रथम आदळतात. पर्वत शिखर ओलांडून जी शिल्लक वारी बाहेर पडतात, ती उंचावरून हैद्राबाद राज्याकडे वळतात. महाराष्ट्र-कर्नाटकांतील हा कमनशिबी प्रदेश मात्र मध्यें तसाच राहतो. सह्याद्रि पर्वत पश्चिम किनाऱ्यावर नसता तर या भागांत भरपूर पाऊस पडला असता. परंतु या एकाच कारणासाठी मोठमोठे पर्वत कापून काढण्याचा शोध अद्याप लावावयाचा आहे. बंगालच्या उपसागरावरून जे पावसाळी वारे वाहतात, ते हैद्राबाद राज्यापर्यंत पोहोंचतात व पुढें त्या वाऱ्यामध्यें पावसाचा सांठा शिल्लक उरलेला नसतो. म्हणून या दोन्हींहि पावसाच्या वाऱ्यांचा उपयोग या प्रदेशास नीट होत नसल्यामुळें, हा भाग नेहमींच कोरडा ठणठणीत राहतो. सह्याद्रि पर्वताच्या भागांत दीड दोनशें इंच पाऊस दरसाल पडतो. तेथून १००।१५० मैलांवरच असलेल्या या प्रदेशांत मात्र पंधरा-वीस इंचांपेक्षा जास्त पाऊस सहसा पडत नाहीं. येथील जमीन सुपीक असूनसुद्धां, पावसाच्या अभावामुळें वरचेवर येणाऱ्या दुष्काळाचें संकट टळू शकत नाहीं. म्हणून ही परिस्थिति पालटण्यासाठी कांहीं तरी कायमची उपाययोजना होणें अवश्य आहे. (अपूर्ण)

## भारतीय रेल्वे शताब्दि प्रदर्शन

दिल्लींत, दिल्ली-मथुरा रोडवरील पुराणा किल्ल्यानजिक ७ मार्च, १९५२ रोजीं पंतप्रधानांचे हस्तें भारतीय रेल्वेचें शताब्दि-प्रदर्शन उघडण्यांत आलें. भारतीय रेल्वे हा देशांतील सर्वांत मोठा राष्ट्रीकरण झालेला धंदा आहे. जवळ जवळ दहा लाख लोक रेल्वेच्या नोकरींत आहेत. दुसऱ्या शब्दांत म्हणजे दर ३५६ माणसांत एकजण रेल्वेनोकर असतो आणि दर ८९ माणसांपैकी एक इसम त्याच्या चरितार्थासाठी रेल्वेवर अवलंबून असतो. भारतीय रेल्वेचें जाळें आशियांत सर्वांत मोठें असून, जगांत त्याचा चौथा क्रम लागतो. भारतीय रेल्वेंतून अहोरात्र दर मिनिटाला २३४० उतारू प्रवास करतात. भारतांतील, खरें पाहतां, आशियांतील पहिली रेल्वे मुंबई तें ठाणें या २१॥। मैल अंतराच्या मार्गावर १६ एप्रिल, १८५३ रोजीं चालू झाली. अशी लहानशी सुरवात करून आज भारतीय रेल्वे ३४,००० वर मैलांवर धांवत आहेत. रशिआ वगळल्यास, सरकारी मालकीच्या रेल्वेंत हाच सर्वांत अधिक मैल लांबीचा मार्ग आहे.

## रेल्वे शताब्दीप्रीत्यर्थ खास पोस्टाचें तिकीट

१६ एप्रिल, १९५३ रोजीं साजऱ्या होणाऱ्या भारतीय रेल्वेच्या शताब्दि स्मृत्यर्थ भारतीय टपाल आणि तारखात्यानें एक खास तिकीट काढण्याचें ठरविलें आहे. त्या तिकिटावर, १८५३ सालीं वापरांत असलेल्या व आज रेल्वेमार्गावर असणाऱ्या अशा आगगाड्यांच्या दोन इंजिनांचें चित्र असेल.

## अमेरिकेंतील चहाचा प्रसार

"येत्या पंधरा वर्षांत अमेरिकेमध्यें चहाचा पुष्कळच प्रसार झालेला आढळेल" असें मत न्यूयॉर्क बंदरांत परदेशांतून येणाऱ्या चहाची तपासणी गेलीं ४० वर्षें सतत करणारे, मि. चार्लस हचिनसन ह्यांनीं व्यक्त केलें आहे. १९५२ मध्यें अमेरिकेंत १० कोटी पौंड चहा आयात झाला तो मुख्यतः भारत, सिलोन व नेदरलंडस ह्या देशांकडून आला. गेल्या वर्षी चहाचा फुटकळ खप अमेरिकेंत ८% वाढला व आयात १२% वाढली. उन्हाळ्यांत भोजनाच्या वेळीं बर्फांतला चहा अत्यंत लोकप्रिय झालेला आहे. अमेरिकेंत चहाचा खप वाढल्यास चहाच्या धंद्यास चांगले दिवस येतील हें उघड आहे. अमेरिकन लोकांनीं अधिक चहा पिणें आपल्या फायद्याचें ठरणार आहे.


स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८३,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ” | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| वैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

## छपविलेल्या उत्पन्नाची सरासरी रक्कम ६ लक्ष रुपये

### प्राप्तीकर–चौकशी–मंडळाच्या कामाचा आढावा

प्राप्तीकर चौकशी मंडळाची १९४७ मध्यें स्थापना झाली. तेव्हांपासून त्याचेकडे सोंपविलेल्या एकूण १,५९१ प्रकरणांपैकी, ८६७ प्रकरणें ३१–१२–१९५२ अखेर निकालांत काढण्यांत आलीं. १९५२ मध्यें २०६ प्रकरणें निकालांत निघालीं. १९५१ मध्यें ही संख्या ३२४ होती, 'सामाजिक दृष्टया महत्त्वाचीं' गणलीं गेलेलीं फार मोठ्या रकमेचा प्रश्न गुंतलेलीं प्रकरणें प्रथम हातीं घेऊन तीं निकालांत काढावींत असें मंडळानें ठरविल्यामुळें निकालांत निघालेल्या प्रकरणांची संख्या कमी झाली आहे. कारण, लहान लहान प्रकरणांची संख्या कमी झाली आहे. कारण लहान लहान प्रकरणांमुळें, हा आंकडा वाढला असता तरी चुकविलेल्या कराचें उत्पन्न पुरेसें उघडकीस आलें नसतें.

या धोरणाला धरून मंडळानें एका गटासाठी पांच व दुसऱ्या गटासाठी चार अधिकारी नेमले आणि बाकी राहिलेले कांहीं थोडे अधिकारी बाकीचीं प्रकरणें पाहात होते. सबंध देशांत अनेक शाखा असलेले हे दोन गट अत्यंत प्रभावी असून, त्यासाठी विस्तृत आणि कसून चौकशी करण्याची आवश्यकता आहे. या गटांपैकी एका गटांतील पांच प्रकरणांचा अहवाल मंडळानें सादर केला असून, इतर प्रकरणांच्या चौकशीचें काम चालू आहे. या प्रमुख गटांच्या चौकशीचें काम संपल्यावर चालू वर्षांत वरील कामाच्या प्रगतींत आणखी वेग येईल. असें झालें म्हणजे सर्व नोकरवर्गाकडे लहान प्रकरणें निकालांत काढण्याची कामगिरी देतां येईल. १९५१ प्रमाणेंच अहवाल सादर केलेल्या प्रत्येक प्रकरणांतील छपविलेल्या उत्पन्नाची सरासरी ६ लक्ष रुपये पडते.

### तडजोडीनें मिटलेलीं प्रकरणें

मागील वर्षाचे मानानें पाहतां तडजोड झालेल्या प्रकरणांच्या संख्येंत बरीच घट पडलेली दिसते. १९५० मध्यें निकालांत काढलेल्या एकूण २३२ प्रकरणांपैकी १९९ म्हणजे सुमारें ८५ टक्के प्रकरणें तडजोडीनें मिटलीं होतीं. १९५१ मध्येंहि अशा एकूण ३२४ प्रकरणांपैकी २७६ म्हणजे ८५ टक्केच प्रकरणांत तडजोडीनें मिटलीं. परंतु १९५२ मध्यें निकालांत काढलेल्या २०६ प्रकरणांपैकीं अवघीं १४३ म्हणजे फक्त ६९ टक्के प्रकरणें तडजोडीनें मिटलीं होतीं.

### कामांतील प्रगति

मंडळानें डिसेंबर, १९४७ मध्यें आपल्या कामास सुरुवात केली आणि त्याच्या कामाचा पहिला टप्पा, म्हणजे प्राप्तीकर कायद्याच्या दुरुस्तीवरील अहवाल सादर करणें, डिसेंबर १९४८ मध्यें पुरा झाला. प्रकरणांच्या चौकशीच्या प्रत्यक्ष कामास १९४९ मध्यें आरंभ झाला, परंतु या वर्षांत बेताचीच प्रगति झाली; कारण, या कामाच्या यंत्रणेस गती यावयाची होती, अनेक ठिकाणांहून जरूर ती माहिती गोळा करावयाची होती, आणि या कामाच्या यंत्रणेस गती देण्याच्या प्राथमिक कामासाठी बराच वेळ लागणें स्वाभाविक होतें.

### कामांतील प्रगति

मंडळानें १९४९ मध्यें २८८ लक्ष रु. छपविलेलें उत्पन्न व सुमारें २१८ रु. प्राप्तीकर समाविष्ट असलेलीं अवघीं १०१ प्रकरणें निकालांत काढलीं. या वर्षांत मंडळ आणि त्याचा नोकरवर्ग यांसाठी ६,०७,४३७ रु. खर्च झाला म्हणजे मिळालेल्या करा-


किर्लोस्कर

५ हॉ.पॉ.वर चालणारा




आमच्या वसंत नं. ३ शरद वगैरे पॉवर चरकांच्या मालिकेंत नवीन 'कोयना' चरकाचे आगमन, कमी पॉवर लागत असल्यानें भांडवलांत बचत झाली आहे.

विशेष माहितीसाठीं लिहा–

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (द. सातारा)

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

वरील खर्चांचें प्रमाण २·८ टक्के पडलें. १९५० मध्यें मंडळानें ९११ लक्ष रु. छपविलेलें उत्पन्न आणि त्यावरील ४९० लक्ष रु. कर समाविष्ट असलेलीं २३२ प्रकरणें निकालांत काढलीं. या वर्षांतील खर्च ८,६२,६३९ रुपये म्हणजे करावरील खर्चांचें प्रमाण १·७ टक्के पडलें.

१९५१ साल त्याहून चांगलें ठरलें. त्या वर्षांत मंडळानें १८१२ लक्ष रु. छपविलेलें उत्पन्न व ९८० लक्ष रु. प्राप्तीकर अंतर्भूत असलेलीं ३२४ प्रकरणें निकालांत काढलीं. त्यावरील खर्च अवघा ८,९०,५१४ रु. म्हणजे करावरील खर्चांचें प्रमाण फारच कमी म्हणजे ·९ टक्का पडलें. १९५२ साल नुकतेंच संपलें असल्यानें त्या वर्षांतील खर्चांचा आंकडा अजून उपलब्ध नाहीं.

### खर्चांचें सरासरी शेंकडा प्रमाण

१९४९,५० व ५१ या तीन वर्षांची सरासरी जमेस धरतां, या कालांत ६५७ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं. या प्रकरणांत २,९१२ लक्ष रुपयांचें उत्पन्न दडविलें होतें व त्यापासून १,६८७लाख रुपये कर मिळाला. या तीन वर्षांत मंडळा-वर एकूण २३,६०,५९० रुपये खर्च झाले; यावरून आकारतां येण्यासारख्या करावर या सर्व कालांत केवळ सरासरी १·४ टक्के खर्च झाला असल्याचें दिसून येतें.

मोठमोठ्या रकमा उजेडांत आणतांना मंडळास आलेल्या शेंकडा खर्चाचें प्रमाण जवळ जवळ प्राप्तीकरखात्याइतकेंच आहे. मात्र या दोन्हींच्या कामांतील फरक इतकाच कीं, प्राप्ती-करखात्यानें ज्या रकमांवर कर आकारला त्यांतील बहुतेक रकमा करपात्र इसमांनीं आपल्या तक्त्यांत भरल्या होत्या, तर चौकशीमंडळाचा विचार करतां हें सर्व छपविलेलें उत्पन्न होतें आणि त्यामुळें कांहीं वर्षांनंतर मोठ्या प्रयत्नांनीं तें शोधून काढावें लागलें आहे.

---

**फक्त पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां**

## नोटीस

पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची विशेष साधारण सभा बँकेच्या सभागृहांत रविवार दिनांक २९ मार्च १९५३, रोजीं सायंकाळीं ५ वाजतां भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील.

(१) दिनांक ७-९-५२ च्या वार्षिक साधारण सभेचें टांचण वाचून कायम करणें.

(२) प्रा. न. का. घारपुरे यांनीं डायरेक्टरांचे निवडणूक नियम नं. १५ यांत सुचविलेल्या दुरुस्तींचा विचार करणें (दुरुस्तींचा मसुदा सोबत आहे.) तसेंच दि. ७-९-५२ च्या वार्षिक साधा-रण सभेंत ठरल्याप्रमाणें मे. बोर्डानें तयार केलेल्या योजनांचा विचार करणें.

(३) सभेपुढें आयत्या वेळीं कांहीं कामें आल्यास त्यांचा मा. चेअरमनसाहेब यांच्या परवानगीनें विचार करणें. सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

पुणें शहर
दि. ७ मार्च १९५३.

बोर्डाचे हुकुमावरून
मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी.
श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर.
एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष)
श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.